Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 845 – 849
DOI: 10.5281/zenodo.10281321

Original Research Article

# खेड्याकडे चला - महात्मा गांधी

प्रा. डॉ. अलका बाबाराव सोमवंशी

विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट, जिल्हा: लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: alkasomwanshi101@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रास्ताविक

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताचे खरे दर्शन हे खेड्यांमध्येच होत असल्याने गांधीजींनी खेड्याकडे चला अशी हाक दिली. ज्यात गाव खेड्यांचे सक्षमीकरण हा महत्त्वपूर्ण हेतू होता. आजही या अभिनव मोहिमेची उपयुक्तता जाणवत असून शहरातील वाढता रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी, शहरांमध्ये निर्माण झालेल्या विविध समस्या, गुन्हेगारी, बाल गुन्हेगारी, भ्रष्टाचार,जागेचा,रोजगाराचा प्रश्न शहरी व्यवस्थापनावर आलेला ताण या गोष्टींचे निर्मूलन करण्यासाठी गांधीजींचा हा मूलमंत्र आजही अनेक समस्यांचे निराकरण करण्याचा मार्ग सुचवतो. भारतातील ७० टक्के लोक शेती हा व्यवसाय करतात व खेड्यामध्ये राहतात. खऱ्या भारताचे दर्शन खेड्यामध्येच होत असते म्हणून गांधीजींनी खेड्याकडे चला अशी हाक दिली. त्यांच्या मते भारतातील खेड्यांचा विकास झाला तर भारताचा विकास आपोआप होईल. त्यामुळे खेड्यांचा विकास होणे गरजेचे आहे असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना वाटते त्यांनी संपूर्ण भारताची पायी यात्रा केली. आणि पूर्ण खेड्यांचे दर्शन घेतले आणि त्यांना जाणवलं की प्राचीन काळी भारतीय खेडी ही स्वयंपूर्ण होती बारा बलुतेदार आणि १८ अलुतेदार हे गावांमधील लोकांच्या गरजांची पूर्तता करत होती. गाव हे सुखी आणि समाधानी होते.स्वयंपूर्ण होते कुटुंबाभधे वृद्धांचा आदर केला जात होता. दारात आलेल्या पाहुण्यांच व बन भीकाऱ्यांच स्वागत केल जात असे. परंतु इंग्रजांचे आगमन झाले, औद्योगिक क्रांती झाली. आणि हळूहळू खेड्यांचे स्वरूप बदलत गेले. खेड्यांमधील कुटीर उद्योग हे कमी होऊ लागले. खेड्यांमधील लोक शहरांमध्ये येऊ लागले आणि त्यामुळे शहरांच्या अनेक समस्या मध्ये वाढ होऊ लागली आणि खेडी आहे त्याच ठिकाणी राहू लागली परंतु जास्तीत जास्त लोकसंख्या ही खेड्यामध्ये राहते कृषी हा आपला मुख्य व्यवसाय आहे. कृषी व्यवसाय हा भारतीय उद्योगांचा आत्मा आहे आणि म्हणून या कृषीचा खेड्यांचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे गांधीजींना वाटले आणि म्हणून गांधीजींनी तरुणांना आव्हान केले की खेड्याकडे चला खेड्यांचा विकास करा. आजही आपणाला या गोष्टींची अत्यंत गरज आहे असं वाटतं म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी खेड्याकडे चला ही महात्मा गांधीजींची संकल्पना अभ्यासासाठी घेतलेली आहे.

**उद्देश**

१. खेड्याकडे चला महात्मा गांधीजींची संकल्पना समजून घेणे
२. खेड्याकडे चला या संकल्पनेची आज काय गरज आहे याचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. यात अनेक संदर्भ ग्रंथ संकेतस्थळे इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

**खेड्याकडे चला गांधीजींची संकल्पना**

**१. ग्रामोद्योग**

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि भारताची लोकसंख्या ही जास्त आहे आणि त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम असणे आवश्यक आहे. यासाठी छोटे छोटे उद्योग उभे करणे गांधीजींना महत्त्वाचे वाटते या छोट्या छोट्या उद्योगांसाठी भांडवल सुद्धा कमी प्रमाणात लागते आणि हे उद्योग करणारे लोक हे अतिशय प्रामाणिकपणे काम करत असतात त्या ठिकाणी भ्रष्टाचार सुद्धा कमी प्रमाणामध्ये होतो. अशी गांधीजींची धारणा होती म्हणून त्यांनी खादी बरोबरच दळणे, कांडणे, साबण, कागद व आगपेठ्या तयार करणे, कातडी कमावणे, तेल काढणे इत्यादी आवश्यक ग्रामउद्योगांना महत्त्व दिले. याशिवाय खेड्याचे अर्थकारण पूर्ण होणार नाही काँग्रेसवाद्यांना या उद्योगात लक्ष घालता येईल आणि ते स्वतः जर ग्रामवासी असतील किंवा खेड्यात जाऊन कायमचे राहतील तर ते या उद्योगात नवीन जोम आणून त्यांना नवीन स्वरूप देतील. जेव्हा जेव्हा व जेथे जेथे ग्रामीण भागात तयार झालेल्या वस्तू मिळू शकतील त्या त्या वेळी व त्या त्या ठिकाणी फक्त खेड्यातून बनलेल्या वस्तू वापरण्यात प्रतिष्ठा मानून त्यास वापरण्याचा सर्वांनी निश्चय करावा. खेड्यात बनलेल्या वस्तूंना मागणी उत्पन्न झाली तर आपल्या भौतिक गरजा आपली खेडीच भागवतील यात काही संशय नाही. आपली मनोवृत्ती झाली म्हणजे आपल्या पाश्चिमात्यांच्या नकलीच्या किंवा यंत्राने बनविलेल्या वस्तू हव्याशा वाटणार नाहीत. परंतु ज्यात दारिद्र्य उपासमार आणि बेकारीचा मागमुस राहणार नाही अशा भावी नवभारताचे दृश्य पुढे ठेवून त्याला साजेल असा शुद्ध राष्ट्रीय अभिरुचीचा आपण परीपाक करू असे गांधीजींचे मत होते. यावरून आपणास असे दिसून येते की आज ग्रामीण भागामध्ये जी बेकारी निर्माण झालेली आहे त्याचे महत्त्वाचे कारण काय असेल तर आपण कुटीर उद्योगांचा केलेला तिरस्कार हा आहे. परंतु आजही बचत गटाच्या माध्यमातून अनेक छोटी छोटी व्यवसाय महिला करू लागलेले आहेत आपल्या भारत सरकारने याकडे लक्ष दिलेले आहे परंतु आणखीनही लक्ष देणे गरजेचे आहे.

**२. ग्रामसफाई**

बुद्धी आणि श्रम यांचा विच्छेद झाल्याकारणाने आपल्या खेड्याकडे आपले अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे आणि त्यामुळे देशभर ठीक ठिकाणी जी सुंदर खेडी पसरलेली असावयाची त्याऐवजी आपल्याला उकिरडे दृष्टीस पडतात. पुष्कळ खेड्यांच्या जवळ जाऊन पोहोचताना जे अनुभव येतो त्याचे मन काही प्रफुलित होत नाही. त्यांच्या भोवताली अशी काही घाण व त्रासदायक दुर्गंधी असते की माणसाला पुष्कळ वेळा डोळे मिटून, नाक दाबून धरावीशी वाटते. आपल्या खेड्यांना सर्व प्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमुने बनवता आले पाहिजे परंतु परंतु खेड्यातील लोकांच्या रोजच्या जीवनाशी आपण समरस होणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांनी कधी मानले नाही अशी गांधीजी काँग्रेसवर टीका करतात.राष्ट्रीय किंवा सामाजिक स्वच्छतेची जाणीव असणे हा आमच्यात आवश्यक सदगुण मानलेला नाही आपण कशातरी प्रकारचे स्नान करतो खरे, परंतु ज्यावेळी तलावात किंवा नदीत किंवा ज्यांच्यासाठी आपण स्नानादी धार्मिक विधी करतो ती घाण झाली तर आपल्याला त्याची परवा नसते या दोषाला मी एक मोठा दुर्गुण मानतो आणि आमच्या खेड्याची व पवित्र नद्यांच्या

पवित्र काठांची जी लाजिरवाणी स्थिती आहे तिला आणि अस्वच्छतेमुळे जे नाना प्रकारचे रोग उद्भवतात त्यांना हा आपला दुर्गुणच कारणीभूत आहे असे गांधीजींचे मत आहे. यावरून आपणास असे दिसून येते की स्वच्छतेविषयी गांधीजी किती जागरूक होते. ग्रामीण समुदायांमध्ये घाणीमुळे जी रोगराई पसरलेली असते. पावसाळ्यामध्ये कितीतरी साथीच्या रोगांची लागण होत असते आणि कितीतरी निराप्रराध मुलांचे आणि स्त्री व पुरुष यांचे बळी जात असतात यासाठी आज भारत सरकारने अनेक प्रयत्न केलेले आहेत. ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव अशा पद्धतीचा विकास भारत सरकारने केलेला आहे तरी परंतु याची योग्य अशी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. नद्या तलाव विहिरी स्वच्छ ठेवण्यामध्ये लोकांचा सहभाग असणे आवश्यक आहे नद्यांचे शुद्धीकरण झोपडपट्टी सुधारणा हे उपक्रम भारत सरकारने राबवलेले आहेत परंतु लोकांचा सुद्धा त्यामध्ये सहभाग असणे याची त्यांना जाणीव असणे गरजेचे आहे.

### ३. आरोग्य आणि स्वच्छतेविषयी शिक्षण

ग्रामसफाई बरोबरच आरोग्य आणि स्वच्छतेचे शिक्षण याला गांधीजींनी महत्त्व दिलेले आहे. निरोगी शरीरात निरोगी मन वास करते हा मानव जातीसाठी कदाचित पहिला नियम असावा या नियमातील सत्ते स्वतः सिद्ध आहे. मन आणि शरीर यांच्यामध्ये अनिवार्य असा संबंध आहे. आपली मने जर निरोगी झाली तर आपण सर्व प्रकारच्या सुखाचा त्याग करू आणि मग स्वाभाविकपणे आरोग्याच्या नियमांचे पालन करू, म्हणजे आपले शरीरे अनासाये निरोगी होतील म्हणून विधायक कार्यक्रमाच्या या बाबीकडे कोणताही काँग्रेसवादी दुर्लक्ष करणार नाही अशी मी अशा बाळगतो. आरोग्य आणि स्वच्छतेचे मूलभूत सिद्धांत सहज शिकून घेण्यासारखे आहेत. रात्रंदिवस स्वच्छ व ताजी हवा घ्या शारीरिक व मानसिक श्रमात समतोलपणा राखा, ताट उभे रहा ताट बसा आणि आपण एकूण एका कामात व्यवस्थित व निर्मळ रहा आणि ही सर्व कामे तुमच्या आंतरिक स्थितीची निदर्शक होऊ द्या. आपल्या मानव बांधवांच्या सेवेसाठी जगण्याकरिता खा स्वतःच्या स्वाद तृप्तीसाठी खाऊ, जगू नका एवढ्यासाठी तुमचे मन व शरीर यांना सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असेल इतकाच तुमचा आहार असावा तुमचे पाणी अन्न आणि हवा हे सर्व स्वच्छ व शुद्ध असली पाहिजे, स्वतःपुरती स्वच्छता बाळगून तुम्ही समाधान न मानता जी त्रिविध स्वच्छता तुम्हाला स्वतःच्या बाबतीत पाळावीशी वाटेल त्याच विविध स्वच्छतेचा प्रचार आपल्या भोवताली तुम्ही करा असा संदेश गांधीजींनी दिला. यावरून आपणास असे दिसून येते की, आज सुद्धा या विचारांची आपल्याला किती गरज आहे परंतु आजची आपली जीवनशैली पाहता असे आपल्या निदर्शनास येत आहे की आपण या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करत आहोत आणि म्हणून परत एकदा आपल्याला कोरोनाच्या नंतर जे व्यायामांची प्रयोगशाळा, व्यायामांचे ऑनलाईन क्लासेस जे निघत आहेत आणि मानवामध्ये जे अनेक वेगवेगळे रोग निर्माण झाले आहेत त्याच्या पाठीमागे गांधीजींच्या तत्त्वांचा स्वीकार आपण केला नाही हेच दिसून येते.

### ४. वर्धा शिक्षण

खेड्यातील मुलांना शिकून त्यांना आदर्श ग्रामीण बनवणे हा या शिक्षणाचा उद्देश आहे. या शिक्षणाची योजना मुख्यत्वे मुलांसाठीच केलेली आहे. या योजनेची मूळ प्रेरणाही खेड्यातूनच मिळालेली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात लहान मुलापासून सुरुवात केली. हल्लीचे प्राथमिक शिक्षण म्हणजे एक फार्स आहे कारण हिंदुस्थानातील खेड्याच्या व तसे पाहिले तर शहरांच्या देखील गरजांचा विचार या योजनेत करण्यात आला आहे. वर्धा शिक्षण हे मुले शहरातील असो किंवा खेड्यातील असो त्याचा भारत वर्षात ज्या काही सर्वोत्तम व चांगल्या गोष्टी असतील त्यांच्याशी सांधा जुळून देते ते शरीर आणि मन दोघांचाही विकास साधते व मुलांना देशाच्या भूमीशी निगडित राहते आणि त्याच्या मनचक्षुपुढे भविष्य काळाचे भव्य चित्र उभे करते आणि हा भविष्यकाळ निर्माण करण्याच्या मार्गी तो बालक किंवा बालिका आपल्या शालेय जीवनाच्या सुरुवातीपासूनच हातभार लावू पाहते. यावरून आपणास असे दिसून येते की आज ही गांधीजींच्या

शैक्षणिक विचारांची खूप गरज आहे.आज जी शैक्षणिक बेकारी निर्माण झालेली आहे त्या पाठीमागे आपण गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वांचा अवलंब केलेला नाही आणि म्हणून आजच्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सुद्धा शासनाने स्वदेशी, स्वभाषा आणि स्वसंस्कृती या गोष्टींना महत्त्व दिलेले आपणास दिसून येते.

५. **प्रौढ शिक्षण**

खेड्यातील मनुष्याचे हिंदुस्तान त्याच्या खेड्यातच साठवलेले असते तो कोठे बाहेरगावी गेला म्हणजे स्वतःच्या खेड्याचाच आपले घर किंवा वतन म्हणून उल्लेख करतो त्याच्या दृष्टीने हिंदुस्तान म्हणजे एक भौगोलिक नाव आहे. खेड्यात किती अज्ञान माजलेले आहे त्याची आपल्याला काही कल्पना नाही. परकीय राज्य व त्याचे दुष्परिणाम याची खेड्यातील लोकांना काही माहिती नाही. जे काय तुटपुंनजे ज्ञान त्यांना सहजगत्या कोठून तरी मिळते त्यामुळे परकीयांचा दरारा वाटून ते गांगारून जातात व याचा परिणाम असा होतो की परकीय लोक व त्यांची सत्ता याविषयी त्यांच्या मनात भीती व द्वेष उत्पन्न होतो. यातून स्वतःची कशी सुटका करून घ्यावी हे त्यांना कळत नाही. आपले स्वतःचे दोष व परकीय सत्ता झुगारून देण्याचे बळ आपल्यात नाही आपल्या अंगच्या शक्तीच्या जाणिवेचा अभाव यामुळेच परकीयांचे अस्तित्व या देशात आहे हे त्यांना माहीत नाही प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढाणा खरे राजकीय शिक्षण तोंडाने देणे हे होईल प्रोंढ शिक्षणात याची व्यवस्थित योजना करून ठेवलेली असते. यावरून असे दिसून येते की गांधीजी खुप दुरदृष्टीचे होते.

**निष्कर्ष**

खेड्यातील लोकांचे जीवन हे शांत व निरामय असते. भारतीय संस्कृतीमध्ये गावाकडची संस्कृती ही आरोग्यदायी संस्कृती म्हणून ओळखली जाते. खेड्याचे जीवन म्हणजे आनंदी आणि निसर्गरम्य वातावरणामध्ये कष्ट करून स्वतःला सुरक्षितता प्रदान करणारे जीवन आहे. खेड्यामध्ये शेती व्यवसाय सोडून इतर व्यवसायांची सोय नसल्याने खेड्यातील लोक आज शहरांकडे धाव घेताना दिसून येत आहेत. खेड्यातील लोक अन्नाच्या शोधात निघून जाताना दिसतात. खेड्यामध्ये शुद्ध वातावरण आणि शांतता आहे पण जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सोयींचा तुटवडा निर्माण होत आहे. त्यामुळे खेड्यामध्ये सगळया सुख सुविधा असणे आवश्यक आहे. आजही भारतात काही अशी खेडी आहेत की ज्या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या सोयी उपलब्ध नाहीत. वीज पुरवठा नाही ना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही, ना रस्ते नीट नाहीत. मुलांना शिक्षणासाठी सुविधा नाहीत. त्यामुळे खेड्यातील लोक अज्ञानी राहत आहेत. काही लोक सुख सुविधांसाठी शहरांकडे धाव घेत आहेत. त्यामुळे खेड्यांची स्वरूप बदलणे गरजेचे आहे. शहराप्रमाणे येथील लोकांनाही उद्योग धंदा काम यामध्ये मदत झाले पाहिजे. शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य तंत्रज्ञानाचे ज्ञान देऊन त्यांच्याकडून उत्तम शेती करून घेतली पाहिजे संपूर्ण देशाला अन्नपुरवठा हा खेड्यातील लोकांच्या कष्टातुनच होत असतो. खरा विकास हा खेड्यातूनच होत असतो. त्यामुळे लोकांच्या विकासाचा विचार व्हायला हवा ज्या दिवशी भारतातील सर्व खेड्यांचा विकास होईल त्या दिवशी खऱ्या अर्थाने सर्व भारताचा विकास होईल आणि महात्मा गांधीजींनी दिलेला नारा खेड्याकडे चला याची पूर्तता होईल. खेड्याकडे चला या गांधीजींच्या संदेशात शेतीबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची बजावणाऱ्या ग्रामीण कुटीर उद्योग. लघुउद्योग १२ बलुतेदार आणि एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे अपेक्षित आहे. कृषी संबंधित श्रम प्रधान उद्योगांचे महत्त्व गांधीजींनी पटवुन दिलेले आहे. गांधीजींचे विचार हे भारतीय अर्थव्यवस्थेला धरून होते त्यांनी अनियंत्रित भांडवलशाहीतील नफेखोरी, संपत्ती संचय, आर्थिक शोषण, अशा सर्व अतिरेकी संपत्ती संचय वैशिष्ट्यांना विरोध करून परिणामी पाश्चाते देशातील आर्थिक संकटासारख्या धोक्यांपासून भारत दूर राहू शकतो, त्याचबरोबर सत्य आणि अहिंसा या तत्त्वाचे मूल्य आजही कमी झालेले नाहीत. आजच्या युगात फक्त आपल्याला गांधीजींच्या विचारांचे नवे संदर्भ शोधण्याची गरज आहे. त्यासाठी गांधीजी प्रमाणे सत्य आणि आयुष्याचा मार्ग प्रामाणिकपणे अंगीकारला जाणे गरजेचे आहे. मागच्या वर्षी कोरोनाच्या लाटेने सर्व जगाला थांबवले

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, सगळेच कार्यक्रम बंद पडले. त्यांचा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम झाला आणि या अर्थव्यवस्थेचे परिणाम संपूर्ण जगभर पडायला लागले. सगळयाच क्षेत्रातील अर्थव्यवस्थांनी स्वतःचा तळ गाठला पण याच वेळी आपल्या भारतातील ग्रामीण भागांनी आपल्या अर्थव्यवस्थेची उरलीसुरली लाज राखली याच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी शेतात उत्पन्न घेऊन आपल्या अर्थव्यवस्थेला सावरण्याचा प्रयत्न केला. जे इतके दिवस खेड्याकडून मानवांचे लोंढेच्या लोंढे शहरांकडे जात होते ते सगळेच लोंढे खेड्यांकडे आले आणि या सगळयांनाच खेड्यांनी आधार दिला या सगळयांनाच खेड्यांनी सामावून घेतले म्हणून आजही खेड्याकडे जाणे आणि खेड्यांचा विकास करणे याची अत्यंत गरज आहे. आपल्याच देशांमधील पोपटराव पवार हिवरे बाजार या ठिकाणी विकास करून रोल मॉडेल तयार केलेले आहे याचबरोबर अण्णा हजारे यांनी सुद्धा राळेगणसिद्धी हे रोल मॉडेल आपल्यासमोर ठेवलेले आहे आणि याचाच आदर्श घेऊन आपल्या महाराष्ट्रामध्ये अनेक खेडी हे आपला विकास करत आहेत या पद्धतीने सर्व महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील खेड्यांचा विकास होणे आजही गरजेचे असलेले दिसून येते.

**संदर्भ सूची**

१. मोहनदास करमचंद गांधी.१९४६.विधायक कार्यक्रम त्यांचे रहस्य व स्थान अहमदाबाद : नवजीवन प्रकाशन मंदिर
२. गांधी रिसर्च फाउंडेशन २०१६. हिंद स्वराज्य-गांधीजी. अहमदाबाद : नवजीवन प्रकाशन मंदिर
३. नरसिंग पी. कुडके कर २०१७. महात्मा गांधी. लातूर : ज्योती चंद्र पब्लिकेशन
४. काचोळे दा.धो. १९९९. ग्रामीण समाजशास्त्र. औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन
५. मोहनदास करमचंद गांधी १०८५ सत्याचे प्रयोग. पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
६. देशपांडे फु.ल. १९७०. गांधी. मुंबई : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती